# २८. माझे पान

- **वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील एक-एक शब्द वापरून वाक्ये वाचा.**

१. मला ............. हे फळ आवडते. (पपई, चिकू, अननस, द्राक्ष, पेरू, सफरचंद)

२. मला ............. हा खेळ खेळता येतो. (कबड्डी, खो-खो, लगोरी)

३. मी ............. हा पक्षी पाहिला नाही. (बदक, कबुतर, कोंबडा, बगळा)

४. मला ............. हा पक्षी आवडतो. (बगळा, चिमणी, मोर, पोपट, कावळा)


५. मला ............. हा प्राणी आवडतो. (उंट, हत्ती, घोडा, म्हैस, सिंह, वाघ, गाय, उंदीर)

६. मी ............. ही पालेभाजी खाल्ली. (पालक, शेपू, मेथी, चाकवत)

७. मला ............. हे वाहन आवडते. (रिक्षा, बस, सायकल, आगगाडी, ट्रक, कार)

८. मी ............. उडवतो. मी ............. फेकतो. मी ............. फिरवतो.
(चेंडू, फुगा, पतंग, भोवरा)

- **चित्रे पाहा. रिकाम्या जागी योग्य शब्द वापरून वाक्ये वाचा.**

**जसे : मी कानाने ऐकते.**

१. मी ............. चालते./चालतो.

२. मी ............. वास घेते./घेतो.

३. मी ............. पाहते./पाहतो.

४. मी ............. वस्तू उचलते./उचलतो.

X5CX5D

## उद्‌दिष्टे

**विद्यार्थ्यांना पुढील उद्‌दिष्टे साध्य करण्यास मदत व्हावी, म्हणून पोषक वातावरण निर्माण करणे.**

१. गाणी समूहात व एकट्याने म्हणणे.

२. चित्रमालिकेच्या साहाय्याने गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करणे.

३. वस्तू, पशू, पक्षी, चित्र इत्यादींबद्‌दल माहिती सांगणे.

४. शाळेबद्‌दल, गावातील/शहरातील ठिकाणांबद्‌दल माहिती सांगणे.

५. आवडते खेळ, खेळणी, वाहने, अन्य वस्तू यांच्याबद्‌दल मित्रांशी गप्पा मारणे.

६. विविध लोकांशी योग्य प्रकारे संवाद साधणे.

७. किमान ६०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती आणि २०० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती विकसित करणे.

८. सुमारे ५० दृक्-शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

९. सूचना वाचून सूचनेनुसार कृती करणे.

### शिक्षकांसाठी
### दिशा अध्ययन-अध्यापनाची

**प्रत्येक पाठाखाली दिलेल्या कृती क्रमाने घ्याव्या. याशिवाय आपल्या कल्पकतेने काही कृती घेता येतील. काही कृती विद्यार्थ्यांचे गट करून घेता येतील.**

## १. पाऊस

१. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात कोणकोणत्या गोष्टी दिसत आहेत हे विचारावे.

२. गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.

३. गाण्याची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी. कृती करून घ्यावी.

४. गाणे म्हणण्याचा, कृतींचा पुरेसा सराव घ्यावा.

## २. मांजराची गंमत

१. चित्रे क्रमाने दाखवावी.

२. प्रत्येक चित्रात काय दिसते ते विचारावे. उदा., मांजर, पातेले, किटली, उंदीर, दूधवाला, दूध, बाई.

३. चित्रांतील प्राणी, प्रसंग यांची ओळख करून द्यावी.

४. एकेक चित्र दाखवून गोष्ट सांगावी.

५. संपूर्ण गोष्ट सांगून झाल्यावर पुन्हा एकेक चित्र दाखवून त्यांतील शब्द विचारावे.
उदा., हे कोण आहे ? हे काय आहे ? मांजराच्या हातात काय आहे ? उंदीर का पळतो आहे ?

६. विद्यार्थ्यांनी सांगितलेले शब्द फलकावर लिहावे.

७. ते शब्द वाचून दाखवावे.

८. त्या शब्दांच्या नामपट्ट्या तयार कराव्या.

९. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्याव्या.

१०. घरातील वस्तूंची नावे विचारावी.

११. ती फलकावर लिहून त्यांचे वाचन करून घ्यावे.

१२. शब्दवाचनाचा सराव घ्यावा.

१३. विद्यार्थ्यांना चित्रे दाखवत गोष्ट सांगावी. गोष्टीतील एकेक वाक्य सांगून विद्यार्थ्यांना मागून म्हणायला सांगावे.

१४. विद्यार्थ्यांना गोष्ट सांगायला लावावी. अडेल तिथे त्यांना मदत करावी.

मांजराची गोष्ट खालीलप्रमाणे –

दूधवाला आला. बाई झोपल्या होत्या. मांजराने पातेल्यात दूध घेतले. एवढ्यात मांजराला उंदीर दिसला. मांजर उंदरामागे धावले. पातेले हातातून निसटले. दूध सांडले आणि उंदीरही पळाला. मांजराची फजिती झाली.

## ३. खेळ खेळूया

१. एकेक चित्र दाखवावे.

२. चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. त्यावर प्रश्न विचारावे.

**जसे –** मुलगा/मुलगी काय करत आहे ? कोणती कृती करत आहे ?

३. कृतींची ओळख झाल्यावर त्यांच्या नामपट्ट्या दाखवाव्या.

४. चित्र आणि नामपट्टी यांची ओळख करून द्यावी. नामपट्टी वाचनाचा पुरेसा सराव द्यावा.

५. नामपट्ट्यांचे वाचन घ्यावे. नामपट्टीप्रमाणे कृती करून घ्यावी.

६. 'राजा म्हणतो', हा खेळ घ्यावा.

**जसे –** विद्यार्थ्यांना गोलाकार उभे करावे. खेळ कसा खेळायचा याची माहिती द्यावी. कृतीची नामपट्टी दाखवावी. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना कृती करायला सांगावी. उदा., वाका, रंगवा, झोपा.

## ४. नक्कल करूया

१. विद्यार्थ्यांना चित्रे दाखवून त्यांचे निरीक्षण करायला सांगावे.

२. प्रत्येक चित्राशी संबंधित प्रश्न विचारावे.

**जसे –** चित्रातील प्राणी/पक्षी कोणता ? त्याच्या शेजारचा मुलगा/मुलगी कोणाची नक्कल करत आहे ?

३. चित्रांतील प्राणी/पक्षी यांची नक्कल करून घ्यावी.

४. चित्र न दाखवताच काही प्राण्यांची नावे फलकावर लिहावी.

५. ती नावे वाचून घ्यावी.

६. नावाप्रमाणे कृती/नक्कल करायला सांगावी.

**जसे –** मासा – दोन्ही हातांचे पंजे एकमेकांवर ठेवून अंगठे हालवणे.

## ५. फळांचा राजा

१. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रातील फळांची नावे विचारावी. त्यांना माहीत असलेल्या फळांची नावे विचारावी.

२. गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.

३. गाण्याची एकेक ओळ म्हणावी.

४. तीच ओळ विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी. प्रत्येक ओळीचा पुरेसा सराव घ्यावा.

५. फळांची चित्रे व त्यांच्या नामपट्ट्या तयार कराव्या. त्या वाचण्याचा सराव घ्यावा.

६. फळांची नावे वापरून वाक्ये सांगण्याचा सराव घ्यावा.

## ६. फळे मोजूया

१. वर्गातील, दप्तरातील वस्तू मोजून त्यांची संख्या मराठीतून सांगण्याचा सराव घ्यावा. (एक ते दहापर्यंतच्या संख्यांसाठी)

२. फळांची चित्रे दाखवावी. त्यांची नावे विचारावी.

३. त्यांच्या नामपट्ट्या तयार कराव्या. त्यांचे वाचन घ्यावे. पुरेसा सराव द्यावा.

४. पाठात दिलेल्या चौकटींतील प्रत्येक फळ मोजायला सांगावे.

५. सांगितलेली संख्या फलकावर लिहावी.

**जसे –** आंबे – ७. त्या संख्येचे मराठीतील नाव सांगावे. संख्या फळासमोर चांदणीत लिहिण्यास सांगावी.

## ७. चित्रे पाहू, गप्पा मारू

१. चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. त्यांतील खेळांच्या साधनांची नावे विचारावी.

२. माहीत नसलेली नावे शिक्षकांनी स्वतः सांगावी.

३. मुलांना प्रश्न विचारून बोलते करावे. त्यांच्याशी गप्पा माराव्या.

**जसे –** विटीदांडू – विटी कोणती? दांडू कोणता? हा खेळ कसा खेळतात? विटी कोलण्यासाठी जो खळगा करतात त्याला काय म्हणतात? विटी झेलल्यावर काय होते ? कोणाकोणाला हा खेळ आवडतो ? खेळून दाखवा. इत्यादी.

४. ज्या खेळाची माहिती विद्यार्थ्यांना नाही, त्या खेळाची माहिती शिक्षकांनी सांगावी. कसा खेळतात हे सांगावे. पूर्वीच्या काळातील काही खेळांची माहिती द्यावी. उदा., सागरगोटे

## ८. ओळख खेळांची

१. विद्यार्थ्यांना एकेक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.

२. चित्रांतील मुले/मुली कोणता खेळ खेळत आहेत, असे विचारावे.

३. तो खेळ कसा खेळतात, याबाबत विद्यार्थ्यांना विचारावे.

४. त्यांच्याकडील माहितीत शिक्षकांनी स्वतः भर घालावी. खेळाची माहिती द्यावी. तो खेळ कसा खेळतात, ते सांगावे.

५. चित्र दाखवून त्याचे नाव विचारावे.

६. चित्राची नामपट्टी दाखवावी. स्वतः वाचावी.

७. नामपट्टीचे वाचन घ्यावे. पुरेसा सराव घ्यावा.

८. खेळांची माहिती झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विचारावे, 'आपल्या वर्गात कोण कोणता खेळ चांगला खेळतो/खेळते ?'

९. फलकावर पाठातील वाक्ये लिहावी. त्यात आपल्या वर्गातील मुलांची नावे घालून, ती वाक्ये वाचावी. विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यावी.

## ९. झोपाळा गेला उडून

१. पाठातील प्रत्येक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.

२. चित्रात काय दिसते आहे, ते विचारावे. मुलांना बोलते करावे.

३. प्रत्येक चित्राला अनुसरून दिलेला मजकूर वाचावा. एकेक वाक्य वाचावे. विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावे.

४. शेवटी पूर्ण गोष्ट सांगावी. गोष्टीतील गंमत सांगावी.

५. विद्यार्थ्यांना गोष्ट सांगायला मदत करावी.

## १०. भाजी घ्या, भाजी

१. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रातील भाज्यांची नावे विचारावी. त्यांना माहीत असलेल्या भाज्यांची नावे विचारावी.

२. गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.

३. गाण्याची एकेक ओळ म्हणावी. कृती करावी.

४. तीच ओळ विद्यार्थ्यांकडून कृतियुक्त म्हणून घ्यावी. प्रत्येक ओळीचा पुरेसा सराव घ्यावा.

५. भाज्यांच्या नामपट्ट्या तयार कराव्या. त्या वाचण्याचा सराव घ्यावा. नामपट्टी चित्रातील भाजीशेजारी ठेवण्यास सांगावी.

६. भाज्या खाण्याच्या गरजेबाबत, आवडीनिवडीबाबत विद्यार्थ्यांशी गप्पा माराव्या.

## ११. ओळख भाज्यांची

१. चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.

२. कशाचे चित्र आहे म्हणून विचारावे.

३. फळभाज्या ओळखण्यास सांगाव्या. त्यांची नावे विचारावी.

४. नावे सांगता न आलेल्या फळभाज्यांची नावे सांगावी.

५. याच पद्‌धतीने पालेभाज्यांची ओळख व नावे सांगावी.

६. भाज्या ओळखण्याचा व नाव वाचण्याचा पुरेसा सराव द्यावा.

७. भाज्या, आहार, जेवण, पदार्थ यांविषयी गप्पा माराव्या.

**जसे –** आवडणारी भाजी कोणती ? का आवडते ? तुम्ही काय काय खाता ? कोणते गोड पदार्थ खाता? कोशिंबिरीमध्ये कोणकोणत्या भाज्या असतात ? भाज्या का खाव्या ? पराठे कशाकशाचे बनवतात ?

## १२. वाहने ओळखू , गप्पा मारू १३. ओळख वाहनांची

१. ठिपके जोडून वाहनांची चित्रे पूर्ण करून घ्यावी. कोणते वाहन तयार झाले ते विचारावे.

२. चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. त्यांत आलेली वाहने व त्यांची नावे विचारावी. नामपट्टी दाखवावी. शब्दांचे वाचन करावे. मुलांचे वाचन घ्यावे. पुरेसा सराव द्यावा.

३. चित्रातील रस्त्यावर चालणारी, आकाशात उडणारी आणि पाण्यावर चालणारी वाहने दाखवावी. त्यांची नावे विचारावी.

४. विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या वाहनांची नावे विचारावी.

५. विद्यार्थ्यांनी कोणकोणत्या वाहनांतून प्रवास केला आहे, याविषयी त्यांच्याशी गप्पा माराव्या.

६. वाहनांच्या चित्रांचा संग्रह करून घ्यावा.

## १४. शोधूया

१. विद्यार्थ्यांना काही प्राण्यांची, फळांची नावे माहीत झाली आहेत. शिक्षकांनी त्यांतील प्राण्यांची, फळांची चित्रे तसेच नामपट्ट्या दाखवून उजळणी घ्यावी.

२. या पाठात आलेल्या नवीन प्राण्यांची, फळांची चित्रे दाखवावी. त्यांची नावे विचारावी. माहीत नसलेल्या प्राण्यांची, फळांची नावे सांगावी. नामपट्ट्यांचे वाचन घ्यावे. पुरेसा सराव द्यावा. **जसे** – म्हैस, उंट, घोडा, बेडूक.

३. पक्ष्यांची चित्रे दाखवावी. त्यांची नावे विचारावी. माहीत नसलेल्या पक्ष्यांची नावे सांगावी. नामपट्ट्यांचे वाचन घ्यावे. पुरेसा सराव द्यावा.

४. चौकोनात दाखवल्याप्रमाणे फळांची चित्रे व त्यांच्या नामपट्ट्यांवरून पाठातील सूचनेप्रमाणे त्यांच्या नावांभोवती खुणा करून घ्याव्या.

## १५. आपला परिसर – १ १६. आपला परिसर – २

१. विद्यार्थ्यांना आई–बाबा किंवा नातेवाइकांसोबत दुकानात गेल्यानंतर आलेला अनुभव कथन करण्यास सांगा.

२. त्यांना पाठातील एकेक चित्र दाखवून प्रश्न विचारावे.
उदा., हे कशाचे चित्र आहे ? या चित्रात काय काय दिसते ?

३. याप्रमाणे सर्व चित्रांवर प्रश्न विचारावे. विद्यार्थ्यांना त्या चित्रांचे वर्णन करण्यास सांगावे.

४. दुकानांना भेटी द्याव्या. माहिती घ्यावी.
**टीप** – विद्यार्थ्यांना घेऊन बसस्थानक, रेल्वेस्थानक, दवाखाना येथे भेटी द्याव्या. माहिती विचारावी.

## १७. खार

१. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.

२. गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.

३. शिक्षकांनी एकेक ओळ म्हणावी.

४. तीच ओळ विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी.

५. विद्यार्थ्यांकडून योग्य कृती व अभिनय करून घ्यावा.

६. प्रत्येक ओळीचा पुरेसा सराव घ्यावा.

७. संपूर्ण वर्गात, गटात व स्वतंत्रपणे गाणे साभिनय म्हणून घ्यावे.

८. चित्र पाहून विद्यार्थ्यांना बोलते करण्यासाठी प्रश्न विचारावे.
**जसे** – खारीचे शेपूट कसे आहे ? ती कशी उभी राहते ? कशी बघते ?

## १८. माझे घर

१. चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रांत काय काय दिसते ते विचारावे.

२. चित्रांच्या आधारे प्रश्न विचारावे.
उदा., स्वयंपाकघरात कोणकोणत्या वस्तू दिसतात ?

३. चित्रवर्णन करून घ्यावे.

४. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरातील वस्तूंची नावे विचारावी. त्या वस्तूंची नावे फळ्यावर लिहावी. वाचून दाखवावी. वाचून घ्यावी.

## १९. घरातील वस्तू

१. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

२. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून वस्तूंची ओळख करून द्यावी. **जसे –** हे कशाचे चित्र आहे ?

३. चित्रांतून वस्तूंची ओळख झाल्यानंतर 'ह्या वस्तू घरात कोठे ठेवलेल्या दिसतात?' असा प्रश्न विचारून त्या-त्या वस्तूचे ठिकाण जाणून घ्यावे.

- स्वयंपाकघरातील वस्तू कोणत्या ?
- बैठकीच्या खोलीतील वस्तू कोणत्या ?
- इतर ठिकाणी असलेल्या वस्तू कोणत्या ?

असे प्रश्न विचारून स्वयंपाकघरातील वस्तूंपुढे ✓अशी खूण करण्यास सांगावे आणि बैठकीच्या खोलीतील वस्तूंपुढे ○ अशी खूण करण्यास सांगावे.

४. पाठात आलेल्या प्रत्येक चित्रातील वस्तूंचा उपयोग काय ते विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावे.

५. वस्तूंच्या नामपट्ट्यांचे वाचन घ्यावे. वस्तूंपुढे नामपट्ट्या ठेवण्यास सांगा.

## २०. ऐकूया, बोलूया

१. विद्यार्थ्यांना या पाठातील वस्तूंची चित्रे दाखवावी.

२. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून वस्तूंची ओळख करून द्यावी.
**जसे –** हे कशाचे चित्र आहे ? – फ्रीज

३. चित्रांतील वस्तूंची ओळख झाल्यावर, 'त्यांचा उपयोग काय ?' असे प्रश्न विचारून उपयोग जाणून घ्यावे.
**जसे –** फ्रीजचा उपयोग काय ?

४. पाठात आलेल्या वाक्यांचे वाचन करून घ्यावे. शब्द ओळखण्याचा व वाचनाचा सराव करून घ्यावा.

५. वाक्यपट्ट्या तयार कराव्या. वस्तूंच्या चित्रापुढे वाक्यपट्ट्या लावण्यास सांगावे.

## २१. कोऽ कोऽ कोंबडा !

१. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे.

२. गाण्यातील प्रत्येक कडव्याची योग्य कृती/अभिनय करून गाणे म्हणावे.

३. शिक्षकांनी एकेक ओळ म्हणावी.

४. तीच ओळ विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी.

५. विद्यार्थ्यांकडून योग्य कृती/अभिनय करून घ्यावा.

६. प्रत्येक ओळीचा पुरेसा सराव घ्यावा.

७. संपूर्ण वर्गात, गटात व स्वतंत्रपणे गाणे साभिनय म्हणून घ्यावे.

८. चित्रे पाहून, गाणी गाऊन विद्यार्थ्यांना बोलते करण्यासाठी प्रश्न विचारावे.
**जसे –** चिमणी, कावळा, पोपट, कोकीळ कसे बोलतात ? त्यांचे रंग कोणते ?

## २२. योग्य काय ?

१. विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीतील 'आरसा रडला, आरसा हसला' या पाठातील दोन चित्रे दाखवावी. विद्यार्थ्यांना त्या चित्रांचे निरीक्षण करायला लावावे. त्यांवर चर्चा करावी.

२. या पाठातील चित्रांवरून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावे. त्यांतील योग्य/अयोग्य कोणते याबद्दल विचारावे. योग्य चित्राला '✓' अशी खूण व अयोग्य चित्राला × अशी खूण करण्यास सांगावी.

उदा., योग्य चित्र कोणते ? अयोग्य चित्र कोणते ?

३. या पद्धतीने उरलेल्या चित्रांवरही प्रश्न विचारावे आणि प्रत्येक जोडीतील चित्रांचे वर्णन करण्यास सांगावे.

४. याप्रमाणे रोजच्या जीवनातील योग्य/अयोग्य गोष्टींची चित्रे विद्यार्थ्यांना दाखवावी.

५. पर्यावरणाची जाणीव नकळत करून द्यावी.

## २३. माझी शब्दबाग

१. सर्व कुंड्यांवरील शब्द वाचून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावेत.

२. विद्यार्थ्यांचा शब्दखेळ घ्यावा.

३. विद्यार्थ्यांना फासा टाकायला सांगावा. वरच्या भागावर दिसणारे ठिपके मोजण्यास सांगावे.

४. त्या संख्येच्या कुंडीतील पानांवर असणारे शब्द वाचायला सांगावे.

उदा., फासा टाकल्यावर 'दोन' पडले, तर कुंडी २ मधील फळांची नावे वाचण्यास सांगावी. आवश्यक तेथे शिक्षकांनी मदत करावी.

५. अशा रीतीने संपूर्ण वर्गातील विद्यार्थ्यांकडून सर्व शब्दांचे वाचन करून घ्यावे.

६. गट करून शब्दवाचनाचा सराव करून घ्यावा.

## २४. कोण कसे ?

१. विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

२. चित्रांखालील सूचना विद्यार्थ्यांना वाचून दाखवाव्या.

उदा., लांब पेन्सिलीपुढे ●● अशी खूण व आखूड पेन्सिलीपुढे ● अशी खूण करण्यास सांगावी.

३. विद्यार्थ्यांना सर्व चित्रांखालील सूचना सांगाव्या. त्याप्रमाणे कृती करून घ्यावी.

४. विद्यार्थ्यांना दोन वस्तूंतील फरक सांगावा. उदा., मोठा व लहान.

५. याप्रमाणे आणखी काही वस्तू प्रत्यक्ष दाखवून त्यांतील फरक दाखवावा.

## २५. कोण कोठे ?

१. विद्यार्थ्यांना पहिले चित्र दाखवावे व चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.

२. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावे. (चित्र पहिले)

उदा., मांजर कोठे आहे ? – मांजर टेबलावर आहे. असे सांगावे.

३. विद्यार्थ्यांकडून उत्तरे पूर्ण वाक्यात म्हणून घ्यावी.

४. अशा रीतीने प्रत्येक चित्रासंबंधी पूर्ण वाक्य म्हणण्याचा सराव करून घ्यावा.

५. विद्यार्थ्यांकडून पाठात आलेल्या शब्दांप्रमाणे प्रात्यक्षिक करून घ्यावे.

## २६. सारखे काय?

१. इयत्ता पहिली व दुसरीच्या पूरक पुस्तिकेतील आलेल्या शब्दांच्या नामपट्ट्या तयार करून घ्याव्या.

२. त्यांतील समान अक्षराने सुरुवात/शेवट होणाऱ्या नामपट्ट्यांचे गट करावे.

३. त्या नामपट्ट्या विद्यार्थ्यांच्या एकेका गटात द्याव्या.

४. त्यांवरील शब्द वाचून घ्यावे.

५. समान अक्षराने सुरुवात/शेवट होणाऱ्या नामपट्ट्यांचे शब्द वाचून समान अक्षरांवर बोट ठेवण्यास सांगावे.
उदा., नाक , बदक , पालक , उंट, उंदीर.

६. पाठात आलेली अक्षरे व त्यांपासून तयार होणाऱ्या आणखी काही शब्दांच्या वाचनाचा सराव करून घ्यावा.

## २७. माझे शब्दभांडार

१. विद्यार्थ्यांना पाठातील चित्र दाखवावे. विद्यार्थ्यांना त्या चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.

२. अक्षरे वाचावी. विद्यार्थ्यांना वाचण्यास सांगावी.

३. शिक्षकांनी एकेक अक्षर वाचावे.

४. विद्यार्थ्यांना एकेक अक्षर वाचण्यास सांगावे. उदा., ई, ल, उं.

५. पाठात आलेली चित्रे विद्यार्थ्यांना दाखवावी. विद्यार्थ्यांना ती चित्रे ओळखण्यास सांगावी व त्यांची नावे विचारावी.

६. चित्रांखालील नामपट्ट्या वाचून त्यांवरून बोट फिरवण्यास सांगावे.

७. शब्दवाचनाचा सराव करून घ्यावा.

## २८. माझे पान

१. वाक्यातील रिकाम्या जागांवर आधारित प्रश्न विचारावे.
उदा., तुमचे आवडते फळ कोणते ? **जसे** – मला अननस हे फळ आवडते.

२. विद्यार्थ्यांना शब्दांचा वापर करून उत्तरे देण्यास सांगावे.

३. वरीलप्रमाणे प्रश्न विचारून गाळलेल्या जागी कंसातील एक-एक शब्द वापरून वाक्ये वाचनाचा सराव घ्यावा.

४. पाठात आलेल्या कंसातील शब्दांची चित्रे विद्यार्थ्यांना गोळा करण्यास सांगावी.

५. शिक्षकांनी शब्दपट्ट्या बनवाव्या. त्या पट्ट्या विद्यार्थ्यांना चित्रांखाली लावण्यास सांगाव्या.

६. शरीराच्या अवयवांची चित्रे दाखवावी. उदा., नाक, कान, पाय, डोळे, हात.

७. विद्यार्थ्यांना पाठात आलेल्या अवयवांच्या चित्रांवरून प्रश्न विचारावे.

८. वस्तू कशाने उचलतात ? कशाने पाहतात ? असे प्रश्न विचारून अवयवांचे उपयोग सांगावे.


९. विद्यार्थ्यांकडून वाक्यांच्या वाचनाचा सराव करून घ्यावा.

१०. शरीराच्या अवयवांचे इतर उपयोग विचारावे.

***


• चित्र पाहा. चित्रात काय काय दिसते ते सांगा.





































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

अमराठी माध्यमांच्या शाळांकरीता
पाठ्येतर पूरक पुस्तिका इ.२ री

₹ ३१.००

